नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

| वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २८७ Issue - 287 | वार बुधवार दि. ५ मार्च २०२५ Blow- Wednesday Date 5 March 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

## थोडक्यात...

### राज्यात सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक तापमानाची नोंद

मुंबई : महाराष्ट्रात उन्हाच्या झळांनी नागरिकांना हैराण केलं आहे. विशेष म्हणजे अजून एप्रिल आणि मे महिना येणं बाकी आहे. मार्च महिन्याला आता कुठे सुरुवात झाली आहे. असं असताना आता तापमानात इतकी वाढ झाली आहे की नागरिकांच्या अंगाची अक्षरश: लाहीलाही होताना दिसत आहे. उकाड्याने नागरीक हैराण होताना दिसत आहे. तापमान वाढत असल्याने दुपारच्या वेळी घराबाहेर पडणं कठीण होत चाललं आहे. महाराष्ट्रात कोणत्या जिल्ह्यात आज किती तापमानाची नोंद झाली आहे याबाबत पुणे हवामान विभागाचे प्रमुख डॉ. के. एस. होसाळीकर यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. राज्यात आज दिवसभरात सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे. सोलापुरात सर्वाधिक ३९.४ डिग्री सेल्सियस तापमानाची नोंद झाली आहे. तसेच सोलापुरातील किमान तापमानदेखील २१.५ अंश सेल्सियस असल्याची नोंद झाली आहे.

# ऑस्ट्रेलियाला धुळ चारत भारत फायनलमध्ये दाखल

## भारत चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये दाखल, विराट कोहलीची अर्धशतकीय खेळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुबई : भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये दिमाखात प्रवेश केला. विराट कोहली पुन्हा एकदा भारताच्या मदतीला धावून आला. विराट कोहलीच्या दमदार खेळीच्या जोरावर भारताने ऑस्ट्रेलियाला धुळ चारली आणि सेमी फायनल सामन्यात दमदार विजय मिळवला. विराट कोहलीने भारताचा डाव सावरत यावेळी संघाला चार विकेट्स राखून विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. विराट कोहलीने यावेळी ८४ धावांची खेळी साकारली. हार्दिक पंड्याने अखेरच्या षटकांमध्ये तुफानी फटकेबाजी करत सामन्यात रंगत आणली.





ऑस्ट्रेलियाच्या २६५ धावांचा पाठलाग करताना भारताला रोहित शर्माने धडाकेबाज सुरुवात करून दिली. पण रोहितला यावेळी पुन्हा एकदा मोठी खेळी साकारता आली नाही. रोहित यावेळी २८ धावा करू शकला. शुभमन गिल या सामन्यात अपयशी ठरला आणि त्याला आठ धावांवर समाधान मानावे लागले. भारताने दोन्ही सलामीवीर गमावले असले तरी विराट कोहलीने ययावेळी श्रेयस अय्यरच्या साथीने भारताचा डाव सावरला. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ९१ धावांची भागीदारी रचली. ही जोडी मोठी धावसंख्या उभारेल, असे वाटत होते. पण त्यावेळी श्रेयस अय्यर हा ४५ धावांवर बाद झाला आणि ही जोडी फुटली. पण त्यानंतर विराट कोहलीने धावांचा ओघ सुरुच ठेवला.

विराट कोहलीने आपले अर्धशतक साकारले आणि त्यानंतर त्याने धावांचा ओघ वाढवला. विराटने अर्धशतकानंतरही आपला आक्रमकपणा सोडला नाही. चुकीच्या चेंडूवर तो चौकार वसूल करत होता. यावेळी विराटने अक्षर पटेलला आपल्या साथीला घेतले आणि विजयाची वीटा रचायला त्याने पुन्हा सुरुवात केली. अक्षर बाद झाल्यावर लोकेश राहुलच्या साथीने विराटने पुन्हा धावा जमवायला सुरुवात केली. पण या प्रयत्नामध्ये विराट कोहलीचे शतक हुकले.


भारताने टॉस जिंकत प्रथम फलंदाजी स्विकारली. ट्रेव्हिस हेड ओपनिंगलाच आला होता. पहिल्याच षटकात त्याला जीवदानही मिळाले होते. त्यानंतर त्याने जलदगतीने धावा जमवायला सुरुवात केली होती. पण वरुण चक्रवर्तीने त्याचा काटा काढला आणि त्ला ३९ धावांवर समाधान मानावे लागले. त्यानंतर ऑस्ट्रेलियाचा कर्णधार स्टीव्हन स्मिथ खेळपट्टीवर ठाण मांडून बसला होता.

स्मिथने अर्धशतक झळकावले आणि तो शतकाच्या दिशेने कूच करायला सुरुवात केली होती. पण त्याचवेळी मोहम्मद शमीने स्मिथची विकेट काढली आणि ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का दिला.

स्मिथने यावेळी चार चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ७३ धावा केल्या. स्मिथ बाद झाल्यावर अलेक्स कॅरीने ऑस्ट्रेलियाची धावगती वाढवली. त्याने अर्धशतकही झळकावले. स्मिथला ६१ धावांवर असताना विराटने बाद केले आणि त्यामुळेच भारताला ऑस्ट्रेलियाला २६४ धावांवर रोखता आले.

# महाराष्ट्रातून गुंडागर्दी घालवली पाहिजे भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र करण्याची हीच वेळ : उद्धव ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या कशी झाली? या संदर्भातले फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यानंतर आज धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची एकमुखी मागणी विरोधकांनी केली. एवढंच नाही तर धनंजय मुंडे राजीनामा देणार नाहीत तोपर्यंत सभागृह चालू देणार नाही अशी भूमिकाच विरोधकांनी घेतली होती. दरम्यान आज धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राजीनामा पाठवला. तो त्यांनी स्वीकारला आणि राज्यपालांकडे पाठवला. राज्यपालांनीही राजीनामा स्वीकारला आहे. या सगळ्या प्रकरणावर उद्धव ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली आहे. त्याच प्रमाणे देवेंद्र फडणवीस पारदर्शी कारभार करत आहेत असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्येचे ते फोटो दोन महिन्यांपासून ते फोटो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे होते का? याचं उत्तर आता त्यांनीच द्यायचं आहे. तसंच धनंजय मुंडे म्हणत आहेत प्रकृती अस्वस्थ असल्याने राजीनामा दिला आहे तर अजित पवार म्हणाले आहेत की त्यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला आहे. नेमका राजीनामा कशासाठी झाला आहे? तसंच जे काही फोटो आणि व्हिडीओ बाहेर आले आहेत त्यानंतरही त्यांचा राजीनामा का घेतला नाही याचं उत्तर सरकारने दिलं पाहिजे.

धनंजय मुंडेंचा राजीनामा झाला आहे. मात्र राजीनामा नेमका काय कारणाने दिला आहे ते कारण समोर आलं पाहिजे तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जे जनतेचे प्रश्न समोर आले आहेत त्याची उत्तरं दिली पाहिजेत. तसंच जनतेने अनेक ठिकाणी बंद वगैरे केले आहेत. जनप्रक्षोभ होऊ नये असं वाटत असेल तर सरकारने उपाय योजले पाहिजेत. आत्ता हे सरकार मजबूत आहे. हीच वेळ आहे महाराष्ट्रातून गुंडागर्दी घालवली पाहिजे भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र करण्याची हीच वेळ आहे. नाहीतर मग आता लाडकी बहीण योजनेप्रमाणे लाडका गुंड सरकारने आणली पाहिजे. महाराष्ट्र बदनाम होतो आहे हे जास्त क्लेशदायक आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पारदर्शी कारभार करत असतील तर त्यांचं स्वागत आहे. मात्र पारदर्शी कारभार करताना त्यांचे हात कुणी बांधत आहेत का? हादेखील प्रश्न आहे. महाराष्ट्राच्या जनतेला आता या सगळ्याचा वीट आला आहे. जनतेला त्यांच्या समस्या सोडवणारं सरकार हवं आहे. एकमेकांच्या व्यथांवर पांघरुण घालणं योग्य नाही असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनीच फोटो आधी त्यांच्याकडे होते का? याचं उत्तर दिलं पाहिजे असही उद्धव ठाकरे म्हणाले.

# विरोधी पक्षनेते पदासाठी भास्कर जाधव यांच्या नावावर शिक्कामोर्तब

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रत्नागिरी: राज्याच्या विधानसभा विरोधी पक्षनेते पदासाठी शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. महाविकास आघाडीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून याबाबतचे पत्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना देण्यात आले आहे.

कोकणातील गुहागर विधानसभेमधून निवडून आलेले आमदार भास्कर जाधव यांनी शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना असा राजकीय प्रवास केला आहे. त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात शिवसेनेतून झाली. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे. मागील काही दिवस भास्कर जाधव नाराज असल्याची चर्चा होती. त्यांनी त्यांची नाराजी उघड बोलून ही दाखवली होती. नुकतेच भास्कर जाधव यांचे बंधू बाळा जाधव यांनी शिंदेच्या शिवसेनेत



प्रवेश केल्याने ठाकरे गटाला मोठा फटका बसला होता.

विरोधी पक्षनेते पदासाठी ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांचं नावही चर्चेत होते. मात्र अंतिम शिक्कामोर्तब जाधव यांच्या नावावर झाले आहे. महाविकास आघाडीच्या बैठकीत ही निवड करण्यात आल्याने आता या नावाला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडून मंजुरी मिळते का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागून राहीले आहे. विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदावर भास्कर जाधव यांची नियुक्ती करावी अशी मागणी करणारे पत्र शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना देण्यात आले. त्यानंतर विरोधी पक्षनेतेपदासाठी अडीच वर्षांचा फॉर्म्युला शरद पवार यांच्या पक्षाने ठेवल्याची चर्चा सुरू झाली असताना त्यावर उद्धव ठाकरे यांनी स्पष्टीकरण दिले असून त्यांनी विरोधी पक्षनेतेपदासाठी अडीच वर्षांचा कोणताही फॉर्म्युला नसल्याचे उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केले आहे.


# सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी चौकशी समितीच्या कामकाजाला सुरुवात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

परभणी : येथे तीन महिन्यांपूर्वी न्यायालयीन कोठडीत मृत्यू पावलेल्या सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणी चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीचे कामकाज सुरू झाले आहे. या कामकाजासाठी सेवानिवृत्त न्यायमूर्ती व्ही.एल. आचलिया यांचे आज मंगळवारी (दि.४) शहरात आगमन झाले. शहरात दिनांक १० डिसेंबरला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात असलेल्या संविधान प्रतिकृतीची विटंबना झाली होती. या घटनेनंतर बंद दरम्यान शहरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी न्यायालयीन कोठडीत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी या युवकाचा मृत्यू झाला होता. या प्रकरणाचे राज्यभर पडसाद उमटले. आपल्या मुलाचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीत झाला अशी भूमिका सोमनाथची आई व त्याच्या सर्वच कुटुंबीयांनी घेतली. याप्रकरणी सेवानिवृत्त न्यायमूर्तींची एक चौकशी समिती नेमण्यात येणार असल्याचे त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्पष्ट केले होते. त्यानुसार घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने शासन निर्णय दि. १५ जानेवारी २०२५ अन्वये सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती व्ही.एल. आचलिया यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे. आज आचलिया यांचे येथे आगमन झाल्यानंतर त्यांनी जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधिक्षक, म.न.पा आयुक्त, अपर पोलीस अधिक्षक, जिल्हा सरकारी वकील यांच्याशी दिवंगत सोमनाथ सुर्यवंशी मृत्यू प्रकरणाची प्राथमिक चर्चा केली. तसेच या कालावधीतील सर्व घटनांची प्राथमिक माहिती त्यांनी घेतली.

# पात्र महिलांच्या खात्यात सन्मान निधीची रक्कम जमा होणार : तटकरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात महायुतीचं सरकार पुन्हा येण्याच्या आधीपासून चर्चेत आलेली योजना म्हणजे लाडकी बहीण योजना. या योजनेच्या पुढील हप्त्याबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. महिला दिन म्हणजेच ८ मार्चच्या आधी ७ मार्चच्या संध्याकाळपर्यंत पात्र महिलांच्या खात्यात सन्मान निधीची रक्कम जमा होणार आहे. आदिती तटकरेंनी याबाबत पोस्ट करुन माहिती दिली आहे.

ज्या कुटुंबांचं वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारनं लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. गेल्या जुलै महिन्यापासून ही योजना सुरू झाली आहे. आतापर्यंत महिलांच्या बँक खात्यामध्ये या योजनेचे एकूण सात हफ्ते जमा झाले आहेत. मात्र फेब्रुवारी उलटून गेला तरी देखील अद्याप आठवा हाफ्ता लाभार्थी महिलांना मिळालेला नाही. तसंच जर आमचं सरकार आलं तर आम्ही लाडकी बहीण योजनेच्या निधीमध्ये वाढ करून महिलांना दर महिन्याला २१०० रुपये देऊ अशी घोषणा सत्तेत येण्यापूर्वी महायुतीच्या नेत्यांकडून करण्यात आली होती. त्यामुळे आता फेब्रुवारीचा हाफ्ता बँक खात्यात कधी जमा होणार? आणि २१०० रुपये कधीपासून मिळणार याकडे लाडक्या बहिणींचं लक्ष लागलं आहे.

लाभार्थी महिलांना दिलासा देणारी बातमी आहे, ती म्हणजे येत्या ७ मार्चपर्यंत लाडक्या बहिणींच्या खात्यामध्ये फेब्रुवारी महिन्याचे दीड हजार आणि मार्च महिन्याचे दीड हजार असे एकूण तीन हजार रुपये जमा होणार आहेत. सरकारकडून या महिन्यात लाभार्थी महिलांना डबल गिफ्ट मिळणार आहे. याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी एक्स पोस्ट करत माहिती दिली आहे. 'लाडक्या बहिणींना महिला दिनाची भेट ! महिला दिनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना फेब्रुवारी व मार्च महिन्याचा लाभ दिला जाणार आहे. ७ मार्च २०२५ पर्यंत सर्व पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात दोन महिन्यांचा सन्मान निधी ३००० रुपये जमा करण्यात येईल' अशी पोस्ट आदिती तटकरे यांनी केली आहे. महाराष्ट्राचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झालं आहे. या अर्थसंकल्पात जर लाडकी बहीण योजनेसाठी वेगळी आणि विशेष तरतूद करण्यात आली तर लवकरच पात्र महिलांना प्रति महिना २१०० रुपयांचा निधी मिळू शकेल अशी चर्चा आहे.

## मुख्यमंत्र्यांनी स्वीकारला राजीनामा

## पुढील कारवाईसाठी राज्यपालांकडे पाठवला

# अखेर धनंजय मुंडे यांचा मंत्रीपदाचा राजीनामा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बीडचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडात कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे सहकारी वाल्मिक कराड याला आरोपी करण्यात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे (राष्ट्रवादी) मंत्री धनंजय मुंडे यांनी अखेर राजीनामा दिला आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, धनंजय मुंडे यांनी माझ्याकडे राजीनामा सादर केला आहे. मी त्यांचा राजीनामा स्वीकारला असून, तो पुढील कारवाईसाठी राज्यपालांकडे पाठवला आहे.

जानेवारीच्या सुरुवातीला, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड सरपंच हत्या प्रकरणातील कोणत्याही आरोपीला सोडले जाणार नाही असे प्रतिपादन केले होते आणि या प्रकरणाचे राजकारण करू इच्छित नसल्याचे म्हटले होते.

संतोष देशमुख यांच्या हत्याकांडात वाल्मिक कराडचे नाव समोर आल्यानंतर विरोधी पक्षातील नेत्यांसह सत्ताधारी पक्षातील नेत्यांनीही मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. संतोष देशमुख यांच्या हत्येवरून विरोधकांच्या दबावामुळे मुंडे यांनी अखेर आज राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. जर धनंजय मुंडे यांनी आज राजीनामा दिला नाही तर सभागृहाचे कामकाज रोखतील, असा इशारा आज विरोधकांनी दिला होता.

कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांनी आज राजीनामा दिल्यानंतर प्रतिक्रिया देताना शिवसेना (उद्धव ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे म्हणाले, मंत्रिपदाचा राजीनामा पुरेसा नाही. सरकार बरखास्त करण्याची गरज आहे. कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती बिघडली आहे. यावर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही.



बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची डिसेंबर २०२४ मध्ये अपहरण करून हत्या करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणात सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर, एक आरोपी अद्याप फरार आहे. २७ फेब्रुवारी रोजी, राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने बीड जिल्हा न्यायालयात सुमारे १,२०० पानांचे आरोपपत्र सादर केले, ज्यामध्ये देशमुख यांच्या हत्येचा आणि त्यासंबंधित दोन प्रकरणांचा समावेश आहे. बीडमधील केज पोलिस ठाण्यात सरपंच देशमुख यांची हत्या, आवदा कंपनीला खंडणी मागण्याचा प्रयत्न आणि कंपनीच्या सुरक्षा रक्षकावर हल्ला असे तीन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याअंतर्गत (मकोका) गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## संपादकीय....

### महिलांचा सन्मान

येत्या ७ मार्चपर्यंत लाडक्या बहिणींच्या खात्यामध्ये फेब्रुवारी महिन्याचे दीड हजार आणि मार्च महिन्याचे दीड हजार असे एकूण तीन हजार रुपये जमा होणार आहेत. सरकारकडून या महिन्यात लाभार्थी महिलांना डबल गिफ्ट मिळणार आहे. याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी एक्स पोस्ट करत माहिती दिली आहे. 'लाडक्या बहिणींना महिला दिनाची भेट ! महिला दिनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना फेब्रुवारी व मार्च महिन्याचा लाभ दिला जाणार आहे. ७ मार्च २०२५ पर्यंत सर्व पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात दोन महिन्यांचा सन्मान निधी ३००० रुपये जमा करण्यात येईल' अशी पोस्ट आदिती तटकरे यांनी केली आहे. महाराष्ट्राचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झालं आहे. या अर्थसंकल्पात जर लाडकी बहीण योजनेसाठी वेगळी आणि विशेष तरतूद करण्यात आली तर लवकरच पात्र महिलांना प्रति महिना २१०० रुपयांचा निधी मिळू शकेल अशी चर्चा आहे. महाराष्ट्रात महायुतीचं सरकार पुन्हा येण्याच्या आधीपासून चर्चेत आलेली योजना म्हणजे लाडकी बहीण योजना. या योजनेच्या पुढील हप्त्याबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. महिला दिन म्हणजेच ८ मार्चच्या आधी ७ मार्चच्या संध्याकाळपर्यंत पात्र महिलांच्या खात्यात सन्मान निधीची रक्कम जमा होणार आहे. ज्या कुटुंबांचं वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारनं लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात.



## श्री गुरुदत्त शुगर्स मध्ये ५४ वा राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताह समारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री गुरुदत्त शुगर्स मध्ये ५४ वा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह मोठ्या उत्साहात समारंभ करण्यात आला.

यावेळी राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाचे झेंडावंदन कारखान्याचे सी.ओ. अतुल पवार, यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सर्व अधिकारी कर्मचारी यानी सुरक्षा सप्ताहाची शपथ घेतली.

यावेळी सेफ्टी अधिकारी अझरुद्दीन कांझी सर बोलताना म्हणाले की अपघाताचे प्रमाण कमी करण्याचा उद्देशाने हा राष्ट्रीय सप्ताह साजरा केला जात आहे.

कारखान्याचे व स्वतःचे नुकसान होऊ नये हा मुख्य उद्देश ठेवण्यात आलेला आहे. अपघाताची कारणे यावर मार्गदर्शन केले.

कामाच्या ठिकाणी योग्य ती काळजी घेणे कामावर प्रेम करणे, जाणीवपूर्वक काम करणे हा सल्ला त्यांनी दिला.

तसेच कारखान्याचे सुरक्षा अधिकारी शामराव पाटील बोलताना म्हणाले की आपल्यापासूनच सुरक्षा चालू करावी कामाचे ठिकाणी अपघात होऊ नये व घरी जाताना सुद्धा सुरक्षित जावा सेफ्टी साधनांचा वापर करा असा सल्ला देण्यात आला.

यावेळी कारखान्याचे सी.ओ. अतुल पवार, एच.आर.महेश पाटील, डिसलरी मॅनेजर शिवराज पाटील, सुरक्षा अधिकारी शामराव पाटील, सि.डी. पाटील, रामा झेंडे, वीरेंद्र पाटील, सुनील परीट, सुनील राजमाने, महावीर नरदे ओमप्रकाश तांबोळे, संजय पाटील तसेच सर्व अधिकारी तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हन्नूरच्या अनंत चैतन्य सेमी इंग्रजीच्या चिमुकल्यांनी केले वृक्षारोपण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हन्नूर/प्रतिनिधी : महान भौतिकशास्त्रज्ञ सी. व्ही. व्यंकटरमन यांचा २८ फेब्रुवारी हा जन्मदिवस राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य सेमी इंग्रजी च्या चिमुकल्यांनी वृक्षारोपण करून महान शास्त्रज्ञ सी. व्ही. व्यंकटरमन यांना अभिवादन करण्याबरोबरच पर्यावरण समतोल साधण्यासाठी आपल्या परीने योगदान देण्याचा प्रयत्न केला.

या चिमुकल्यांना शिक्षिका सुरवसे मॅडम, कोळी मॅडम, पवार सर व सेमी इंग्रजी विभाग प्रमुख श्री. शशी अंकलगे सर यांचे प्रोत्साहन मिळाले. या लहान चिमुकल्यांनी केलेल्या स्तुत्य उपक्रमाचे, त्यांच्या प्रयत्नाचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे संचालक व मार्गदर्शक मा. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संस्थेचे आधारवड व हन्नूर प्रशालेचे माजी प्राचार्य मा. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका व मार्गदर्शिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूर चे उपसरपंच व युवा नेते मा.सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी कौतुक केले.

# डिजिटल काळातील 'आधुनिक' स्त्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोशल मीडिया आजच्या युगात महिलांसाठी एक प्रभावी आणि महत्त्वाचे साधन ठरले आहे. यामुळे महिलांना स्वतःचे विचार मांडण्याची, समाजात जागरूकता निर्माण करण्याची आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याची संधी मिळत आहे. मात्र, यासोबतच काही नकारात्मक परिणामही जाणवतात.

सोशल मीडिया चे स्त्रियांवर सकारात्मक परिणाम

१. स्वतंत्र अभिव्यक्ती आणि सशक्तिकरण – आवाज उठवण्यासाठी प्रभावी व्यासपीठ ठरले आहे. पूर्वी महिलांचे प्रश्न आणि समस्या लोकांपर्यंत पोहोचवणे कठीण होते. पण आज सोशल मीडियामुळे स्त्रिया त्यांचे हक्क, विचार आणि अडचणी मोकळेपणाने व्यक्त करू शकतात. महिलांना आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. जसे की चशढे, थोशपर्एोशीाशपीं यांसारखे अनेक सामाजिक चळवळी सोशल मीडियाद्वारे पुढे आल्या. ड्शश्रषर्डेश आणि बॉडी पॉझिटिव्हिटी – महिलांना स्वतःच्या शरीराविषयी आत्मविश्वास मिळावा म्हणून अनेक महिला कार्यकर्त्या आणि इन्फ्लुएंसर्स सोशल मीडियावर सकारात्मक संदेश देत आहेत.

२. शिक्षण आणि जागरूकता – सोशल मीडियाच्या माध्यमातून महिलांना शिक्षण, आरोग्य, कायदे आणि हक्क यांची माहिती मिळते.

३. व्यवसाय आणि उद्योजकता – सोशल मीडियाचा वापर करून अनेक महिला ऑनलाइन व्यवसाय सुरू करत आहेत, जसे की घरगुती पदार्थ विक्री, फॅशन डिझायनिंग, कंटेंट क्रिएशन इत्यादी.

४. करिअर आणि नेटवर्किंग – प्रोफेशनल नेटवर्किंगसाठी सोशल मीडिया उपयोगी ठरत आहे, ज्यामुळे महिलांना नवीन संधी मिळतात.महिलांसाठी मोफत ऑनलाईन कोर्सेस, वेबिनार्स आणि शैक्षणिक व्हिडीओ उपलब्ध आहेत. आरोग्य, आर्थिक साक्षरता, कायदे, हक्क, महिलांसाठी सरकारी योजना यांची माहिती सहज मिळू शकते.

सोशल मीडिया चे स्त्रियांवर नकारात्मक परिणाम

१. सायबर गुन्हे आणि ऑनलाईन छळ – महिलांना ट्रोलिंग, अपमानास्पद कमेंट्स आणि ऑनलाइन छळाचा सामना करावा लागतो.सोशल मीडियावर महिलांना ऑनलाईन ट्रोलिंग, शिवीगाळ, मानहानी, स्टॉकिंग आणि ब्लॅकमेलिंग यांसारख्या समस्या भेडसावत असतात.

२. खोट्या सौंदर्यप्रमाणांचे दडपण – इंस्टाग्राम, फेसबुक यासारख्या प्लॅटफॉर्मवर दाखवले जाणारे सौंदर्यप्रमाण स्त्रियांवर मानसिक तणाव टाकतात. साधं फोटो अपलोड करायची सध्या हिंमत होत नाही. बिना फिल्टरने कॅमेरा समोर येण्याचं दडपण आणि पॅनिक होताना ती दिसतेय.सोशल मीडियावर महिलांना परिपूर्ण सौंदर्याचे अवास्तव निकष दाखवले जातात, जसे की गोरी त्वचा, परफेक्ट फिगर, लक्झरी लाइफस्टाईल. खोटे सौंदर्यप्रमाण आणि आत्मविश्वासावर परिणाम

३. गोपनीयता आणि सुरक्षितता धोक्यात – अनेकदा महिलांच्या फोटोंचा गैरवापर केला जातो किंवा त्यांची खाजगी माहिती लीक केली जाते. याबाबत अनेक गुन्हे घडून गेले व घडतं आहे.

४. फसवेपणा आणि दिशाभूल करणारी माहिती – सोशल मीडियावर खोट्या बातम्या किंवा चुकीच्या सल्ल्यांमुळे स्त्रियांना फसवले जाऊ शकते.

सोशल मीडिया हे स्त्रियांसाठी सशक्तिकरणाचे एक प्रभावी माध्यम आहे, परंतु त्याचा योग्य वापर करण्याची गरज आहे. महिलांनी डिजिटल साक्षरता वाढवून सुरक्षिततेच्या उपाययोजना स्वीकारल्या, तर हे माध्यम त्यांच्यासाठी आणखी फायदेशीर ठरू शकते.

■ सोशल मीडिया आणि स्त्रियांचे सशक्तिकरण.

■ सोशल मीडियाचा अतिरेक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम

■ सोशल मीडिया सतत पाहिल्याने मानसिक तणाव, न्यूनगंड आणि अवसाद वाढू शकतो.

■ अनेकजण लाईक्स, कमेंट्स आणि फॉलोअर्सच्या संख्येवर अवलंबून राहतात, त्यामुळे स्व-मूल्यांकन कमी होते.

महिलांसाठी सोशल मीडिया सुरक्षित आणि फायदेशीर कसे ठरू शकते?

(१) सुरक्षितता आणि गोपनीयता राखा सोशल मीडियाच्या प्रायव्हसी सेटिंग्स योग्य रीतीने वापरा. अनोळखी व्यक्तींना फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका आणि आपले वैयक्तिक फोटो शेअर करताना सावध रहा. संशयास्पद मेसेज किंवा लिंक क्लिक करू नका.

(२) सायबर सुरक्षेची माहिती घ्या सायबर कायदे आणि महिलांचे हक्क जाणून घ्या. सायबर गुन्ह्यांची तक्रार सायबर सेल किंवा हेल्पलाइनवर करावी.

(३) सकारात्मक आणि संतुलित वापर करा सकारात्मक कंटेंट बघा आणि मानसिक आरोग्य जपण्यासाठी सोशल मीडिया वापरावर नियंत्रण ठेवा. ऑनलाईन वेळ मर्यादित करा, जेणेकरून सोशल मीडियाचा अतिरेक होणार नाही.हेल्पलाईन, सायबर सुरक्षा याविषयीं जागरूक राहा..

जाहिराती आणि रील्स या माध्यमातून स्त्रीचे शरीर वापरले जाते. आता ती स्वतःहा पुढाकार घेउन अंग प्रदर्शन करण्यात आनंद मानते. हा प्रकार काही प्रमाणात अतिशय लाजिरवाण आहे. त्यात ज्या अगदी वयस्कर महिला सुद्धा आहे. त्यांनासुद्धा हे सगळं करतांना गंमत वाटते. पुरुषांचे वखवखले नजरा रोखण्यासाठी अनेक कायदे निघाले. पण जिथं स्वतःहून महिला पुरुषांना आकर्षित करण्यासाठी नको ते प्रकार करत असेल तर काय करायच.? नजरा बदलायचं, विचार बदलायचे हे सगळं अगदी बरोबर आहे. पण याच अर्थ अगदीच नागडं फिरेपर्यंत कपडे घालायचे की जिथं अश्लील वाटेल या मर्यादेबाहेर रील्स बनवणाऱ्या महिलेच काय विचार आणि त्या रील्सचा प्रभाव लहान मुलं, किशोरवयीन मुलावर नक्रारात्मक होतो आहे. स्त्रीशरीराकडे एक उपभोग वस्तू म्हणून पाहण्याची व्यापारी दृष्टी निर्माण झालीय. झपाट्याने यात वाढ झाली आहे. वर्तमानपत्रात अबलांच्या दृष्क्रूत्याविषयी बरेच छापून येते. सोशल मीडियावर व्हिडीओ बघायला मिळतात. पण हा अनर्थ मिटवून टाकण्यासाठी काय करता येईल हा विचार कोणी करावा.? स्त्रीच्या ख च्या काळात दास्याला सुरवात झाली हे वाचायला अवघड वाटतं. कारण सर्व बाजूला ठेवून ती मोबाईलच्या विळख्यात दलदलीत रुतत चालली आहे.

सर्व थरातील स्त्रियांचे समान वैशिष्ट्य आढळून येते. मानवी शक्तीला जन्म देणारी स्त्री. गुलामाच्या साखळ्या तोडून झाले. जुन्या रूढी परंपरा आणि संस्कारासारखे बोजे काही प्रमाणात कमी झाले. सुशिक्षित स्त्री आणि अशिक्षित स्त्री एकत्र येऊन काम करू शकते. उच्चवर्णीय स्त्रीया आणि दलित स्त्रिया विभागणाऱ्या रेषा पुसून काढू शकतात का? यातही काही अंशी बदल झालाय. स्त्रियांमधील भिंती गळून पडतील का? हा विषय मात्र गंभीर आहे. ज्या स्त्रियां वॅलेंनटाईन डे साजरा करतात त्याच स्त्रियांना हळदी कुंकू मध्ये विधवा स्त्रिया नकोअसतात. विधवा स्त्रियांनी कुंकू लावणं म्हणजे आधुनिक आणि मूर्खपणा वाटते. पण लाल रंगाचे वन पीस घालून विधवा आणि सर्व महिला नाचून दिवस साजरे करतात पण कुंकू लावन्यासाठी मर्यादा येतात. आधुनिक सण म्हणून विदेशी दिवस स्वीकारताना तिकडच्या विवाहित महिला सौभाग्यच लेण म्हणून लायसन अडकवून फिरत नाही. ते का नाही समजून घेतल? विधवा आणि विवाहित यात फरक समजून हळदी, शुभ कार्यक्रम, सणवार यात तीला अडवलं जात नाही.

स्वतःच्या शरीरावर, जीवनावर तिचा अधिकार असतो का? स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासाची शक्यता काय? दारू पिऊन नालीत पडणारा, मारणाऱ्या नवऱ्याला बाहेरच्या जगात आपल्यावर बलात्कार आणि वाईट नजरेच्या भीतीने सोडता येत नाही. कसाही असो पण नवरा घरात असायला हव. एकट जगणं अवघड आहे. त्यासाठी स्त्री च आयुष्य बाई भोगायला असते. थोडी कळ सोसावी लागते असं म्हणत कपड्याने आधुनिक राहणाऱ्या स्त्रिया सुद्धा मानसिक गुलाम असतात. सहन करतात.

घरची व दारची डबल पाळी (शिफ्ट) मीच का करायची ? ऑफिस मधून आल्यावर घरातली नोकरीं स्त्री म्हणून सांभाळून न्यावीच लागते. माझी नोकरीं घरासाठी आहे की केवळ एटीएम मशीन आहे. आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असूनही माझ्या जीवनावर माझा अधिकार का नाही?

'आधुनिक' बनणे म्हणजे जीन्स टी शर्ट, वन पीस घालून मिरवण नव्हे. डिग्र्याची शेपटे मिळविणे नव्हे. आधुनिक म्हणजे स्वःतत्व मिळविणे. स्वतःच्या मनात स्वसन्मानाची जाणीव जागृत करणे. विकासाची संधी शोधणे, निर्णय घेण्याची क्षमता, दुर्बलता नसून स्वतःच्या आंतरिक शक्तीला ओळखणे, मागासलेपणा टाकून देणे असते . भारतीय संस्कृतीमध्ये मुलींना सावत्रपणाची वागणूक दिली जाते. नवऱ्याला दीर्घायुष्य मिळणे, त्याला खुश ठेवणे त्यासाठी व्रत, उपवास हे



इतिकर्त्यव समजले जाते.

मुलगी वयात येतांना होणारे शारीरिक बदल हे शास्त्रीय पद्धतीने समजावून न सांगता अस्पृश्य समजले जाते. आमंगल समजले जाते. 'बाईचा जन्म गं बाई आता जन्मभर हाच भोग.!' स्त्री अबला समजून तिला आणखी दुबळे बनविले जाते.

शरीराला जागवून सुखाची देवाण घेवाण होण्याचे प्रसंग तिच्या जीवनात आले नसेल, घर इतर कर्जाचा डोंगरात तो हरवला असेल तेव्हा स्त्रीच्या मनाचा तळ गाठण्याची गरजच वाटतं नाही. तो आक्रमक ती धास्तावलेली आणि तिने शरीर मिटवून घेतले असते.

सध्या स्त्रियांचे स्वतंत्र्याचा पुरस्कार केला. आणि हे स्वतंत्र्य तकलूबी नव्हते. पण आता या मनमोकळं जगण्याचा आस्वाद स्त्रियांना घेता येत नाही. ज्यांना घेता येतो त्यांचं संघर्ष अजूनही ते अस्तित्व टिकवण्यासाठी मी सगळं करू शकते या सुपर वूमन चे पंख लावून उडण्याचा प्रयत्न करते. सर्वाना आनंदी ठेवणं, सगळं एकत्र करण्यात तिचं जगणं राहून जाते, स्वप्न अर्धवट कुठंतरी अडकून पडलेले असतात. त्यासाठी काही धडपड करतात. काही आहे तसंच जगतात. हे सगळं मिसेस मुव्ही मध्ये खूप चांगल्या पद्धतीने रेखाटलं आहे. स्त्री ही शोषित होती आहे पण स्वातंत्र या नावाखाली काहीही करायच हे स्वतःच तिने स्वतःसाठी ठरवावं.

हिंदू कोडं बिलाचा गाभा स्त्रीस्वातंत्र्याशी निगडित होता. पुरुसत्ताकतेच्या बेड्यातून भारतीय स्त्रीयांची मुक्ती व्हावी हा एकमेव हेतू. न्याय विकत घेणे सहज शक्य आहे. जातपंचायत बंद व्हायला हवी. न्यायालयतातून मिळणार न्याय हा वेळखाऊ आहे. पैसेखाऊ आहे. यात वकिलांची पोटे भारतात. स्त्रियांना खरा न्याय मिळत नाही. कोर्टातील नोकरशाही संवेदनशून्य भ्रष्ट स्वरूपाची आहे. शिक्षण, सामाजिक दर्जा, पती -पत्नी संबंध, सामाजिक उत्पादन प्रकीयेत सहभाग यासाठी पोषक मागणी करणं गुन्हा आहे का?

अस्मितेचा राजकारणाचा आशय नेहमी परिवर्तनशील असला पाहिजे. पणराजकारणात बसलेल्या महिलाच महिलांना विरोध करतांना दिसतात. केवळ दिखावा म्हणून काही गोष्टींना समर्थन करतात. राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अन्याय दूर करण्याचे हितसंबंध त्यात असतील तरच ती अस्सल अस्मिता असते. आयुष्यभर जातीव्यवस्थेमुळे प्रचंड चटके सहन केलेला हा माणूस आपल्या मूल्य विचारांशी दृढ राहिला. स्त्री -मुक्ती चळवळ पुरुषविरोधी नाही. तेसगळं पुरुषप्रधान समाजरचनेविरोधी आहे.

स्त्रीच्या माथी मारण्यात आलेल्या घरघुती कामाचे सामाजिकरण होणे आणि अपरिहार्य घरघुती कामांची जबाबदारी ही स्त्री पुरुषांची उभयंताची समान जबाबदारी आहे स्त्रिया त्यांच्या कौटुंबिक कामाच्या ओझ्यातून मुक्त होऊ शकतील आणि सर्वांगीण सामाजिक जीवनात मोकळेपणाने व बरोबरीने भागीदारी करू शकतील. लिंगभेदावर आधारित श्रामविभागणी ही कुटुंबव्यवस्था आणि लग्नसंस्था यांचा आत्मा आहे म्हटलं तर कुटुंबव्यवस्थेवर प्रहार होईल. त्यामुळे समंजस्या हव. व्यवंहरातून पुढे जातो पण जुन्या चालतीती आणि वैचारिक बैठक मागे रेंगाळत राहतात.

**जातीव्यवस्थापक समाजाच्या साहित्यातील स्त्री :–**

भारतीय स्त्री वर्ण आणि जाती यांच्या बेड्यांनी बंदिस्त राहिली आहे. जातीचे पोट फोडूनवर्गव्यवस्था उभी उदयास आली. ती भारतीय स्त्री ची दुसरी बेडी आहे. दुसरं प्रश्न लिंगभेद म्हणजे स्त्री हे दुय्यम स्थान. स्त्रीने जर जात धर्म या विचारातून स्वतःला बाहेर काढलं तर, मुलांवर तशी योग्य संस्कार करेल. जातीबाहेर होणारे विवाह, ऑनर किलिंग, जळण, हत्या करणं अशी गंभीर गुन्हेतरी घडणार नाही. जातकुळ स्त्रीच्या मनात घट्ट रुजवली आहे. आदिवासी आणि दलित स्त्री वर अजूनही बलात्कार केले जातात आणि करणारा उच्चवर्णीय असतो. म्हणजे या शतकत सुद्धा हे सगळं स्वभाविक समजलं जाते. ज्याची दखल केवळ दिखावा करण्यापूर्ती कॅंडल मोर्चा निघतो. शासन नंतर त्याची दखल घेत नाही. अतिशूद्र ही उपभोगसाठी आहे त्यात ती स्त्री आहे तर पूर्णपणे उपभोगण्यासाठी आहे. ही पूर्वापार धारणा तोडण्यासाठी घरात आई वडील संस्कार कशी देतात व समाजात वावरताना अनुभव काय येतात यावर अवलंबुन आहे. याला विरोध करण्यासाठी दृष्टिकोन समजलं पाहिजे.भारतात स्त्रियांचे शोषण मुख्यत: जातीव्यवस्थेद्वारे होते. स्त्रिया या जातीव्यवस्थेच्या प्रवेशद्वार आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, जात म्हणजे बंदिस्त वर्ग होय. पुरुषीजातपंचायतीच्या कायद्यातून स्त्रियांची मुक्ती झाली पाहिजे. दाखवण्यापूर्ती बंद झालं असं भास आहे पण रस्ते, पद्धती बदलले.

स्त्री शिक्षण, प्रोढविवाह, विधवा पुनर्विवाह, स्त्रियांचे अधिक स्वालंबन, सती यातून नुकतीच ती बाहेर पडली पण आता वेगळ्या नात्यात गुंफत जात आहे.

जस की,. बेंचिंग, सिच्यूएशनशिप(भावनिक जोड असते पण गंभीर कमीटमेंट नसते.), लिव्हिंग रिलेनशिप, ओपन रिलेनशिप, लॉन्ग डिस्टन्स रिलेनशिप, कॅज्यूअल रिलेनशिप (गंभीर नात्याची अपेक्षा न ठेवता केवळ मजा म्हणून सोबत शारीरिक आधारावर, आकर्षणावर आधारित संबंध असते.), फ्रेंड्स विथ बेनिफिट्स (ऋश्रइ- मित्रअसताना शारीरिक जवळीक असलेलं नातं यात भावनिक गुंत्वणूक कमी असते.,पॉलअमरी रिलेनशिप ( एकापेक्षा अनेक व्यक्तींशी एकाच वेळी निष्ठने आणि परस्पर समंतीने संबंध ठेवणे ), वर्च्युअल रिलेनशिप (शोशलं मीडिया, डेटिंग ॲप्स, ऑनलाईन नाते ), अरेंज्ड रिलेनशिप इत्यादी ज्यात स्त्री स्वतःहून किंवा भावनापोटी कैद होऊन शेवट तिचं एखाद्या क्राईम मध्ये घडलेलं बघायला मिळते.

स्त्रीदास्याच्या कायद्याची चौकट तोडून व्यक्ती स्वातंत्र्यवादी वर्गीय कायद्याकडे असायला हवी. एखादा पुरुष समाजसेविका आहे म्हणून तिचं नंबर प्रत्येक पुरुषाला देतो कि, ही बाई आमच्या ओळखीची आहे. बाई साहेब आले तुमच्या शहरात यांना भेटायला जा. कधी मदतीला उपयोगी ठरतील. फुलांचा गुलदस्ता घेऊन जा. पोलीस खात्यातल आहे म्हणून म्हटलं असेल असं सकारात्मक अर्थ काढलं पण बाई भेटायला गेली नाही तरदुसरा माध्यम अमलात आणलं. पुन्हा एका प्रिंसिपलचा नंबर देत असं मोठेपणा सांगतो कि जणू तो म्हणजे एखादा महामंत्री आहे. ती बाई म्हणजे स्त्री दासी आहे. म्याडम तुमचा नंबर देतोय.नवीन आहेत तुमच्या शहरात. त्या पुरुषाच फोन येतो आणि थेट कोण आहे काय आहे कसलाही परिचय न देता प्रश्न करतो, म्याडम गेस्ट हाऊस कुठे आहे.? बाई भयंकर चिडलीय. कसलं गेस्ट हाऊस, मी गेस्ट हाऊस चालवत नाही. कुणाशी बोलताय. चुकीचं नंबर डायल केलं तुम्ही. नंतर त्याने विषय बदलत स्वतःची बाजू राखून बोलला. पण एक स्त्री म्हणून ही पुरुष काय समजतात या विचाराने डोकं तडकल.

डिजिटल काळातील आधुनिक स्त्रीने, जागरूक असणं, काय चांगल, वाईट याच खोलवर विचार करून समाजव्यवस्था टिकवन जिथं आपलं अस्तित्व, मर्यादा, सन्मान यालाही टिकवून देश सुसंस्कृत, आणि उद्याच भविष्य घडवतांना स्त्रीचा मोठा वाटा असतो ते पटवून देणं महत्वाच आहे.

जिच्या हाती पाळण्याची दोरी । तिच जगाते उद्धारी । ऐसी वर्णिली मातेची थोरी । शेकडो गुरूहुनिहि ।। – संत तुकडोजी महाराज. या आशयाप्रमाणे शूरवीर छत्रपती शिवाजी महाराज घडवतांना जिजाऊच्या अमोल मार्गदर्शनामुळे स्वराज्य निर्माण झाले. भीमाईमुळे, रमाईच्या त्यागामुळे, कष्टमुळे डॉ. बाबासाहेब घडले आणि देशाला संविधान मिळाला, हिंदू कोडं बिलं मिळालं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजातील महिलांच्या हक्कांसाठी मोठे योगदान दिले. त्यांनी स्त्रियांना समानता, शिक्षण, संपत्तीचे अधिकार आणि सामाजिक न्याय मिळावा यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांच्या योगदानाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

१. हिंदू कोड बिल (ऊळपर्वी उेवश इळश्रश्र) आणि स्त्रियांचे हक्क

बाबासाहेबांनी १९४८–१९५१ दरम्यान हिंदू कोड बिल मांडले, ज्यामुळे हिंदू महिलांना अनेक महत्त्वाचे अधिकार मिळाले:

*संपत्तीवर हक्क – महिलांना वडिलोपार्जित संपत्तीतील समान वाटा मिळावा.

*घटस्फोटाचा अधिकार (ऊळपर्वी चरीीळरसश लीं, १९५५) – विवाहातील अन्यायकारक परिस्थितीत स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार मिळावा.

*पुनर्विवाहाचा अधिकार – विधवा महिलांना पुनर्विवाह करण्याचा हक्क.

*नातेवाईकांच्या संपत्तीतील हक्क – मुलींना त्यांच्या कुटुंबाच्या संपत्तीतील समान हक्क.

२. शिक्षणाचे हक्क:– बाबासाहेबांनी स्त्रियांना शिक्षण देण्यावर विशेष भर दिला. त्यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हे ब्रीद दिले, जे स्त्रियांनाही लागू होते. त्यांनी महिलांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले आणि महिलांच्या शैक्षणिक संधी वाढवण्यासाठी प्रयत्न केले. ३. समान वेतन आणि रोजगारातील हक्क:– बाबासाहेबांनी कामगार महिलांसाठी समान वेतनाचा अधिकार आणि अन्यायकारक कामाच्या तासांवर निर्बंध घालण्यास मदत केली.त्यांच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांना सरकारी आणि खासगी क्षेत्रात समान संधी मिळू लागल्या. ४. स्त्री–पुरुष समानता आणि सामाजिक सुधारणा त्यांनी बालविवाहाच्या विरोधात भूमिका घेतली आणि महिलांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांनी सती प्रथेविरुद्ध, देवदासी प्रथेविरुद्ध आणि अन्यायी धार्मिक परंपरांविरुद्ध आवाज उठवला. ५. संविधानातील महिलांचे हक्क:–डॉ. आंबेडकर यांनी भारतीय संविधानात महिलांसाठी खालील अधिकार सुनिश्चित केले:

१. समानता अधिकार (कलम १४) – सर्व महिलांना समान हक्क. २. भेदभावविरोधी अधिकार (कलम १५) – लिंगावर आधारित भेदभावाला प्रतिबंध. ३. स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९) – महिलांना बोलण्याचा, शिकण्याचा आणि काम करण्याचा अधिकार. ४. शोषणाविरोधी अधिकार (कलम २३–२४) – महिलांना शोषणापासून संरक्षण. ५. संपत्ती हक्क (कलम ३००) – महिलांना संपत्तीचा अधिकार ६. महिलांसाठी विशेष कायदे आणि सुधारणा बाबासाहेबांच्या विचारांमुळे आणि पुढील कायद्यांमुळे स्त्रियांना अधिक संरक्षण मिळाले:

■ मातृत्व लाभ अधिनियम (चरशिीपळीं इशपशषळीं लीं, १९६१) – गरोदरपणात महिलांना सुटी आणि आर्थिक मदत.

■ घरेलू हिंसाचार प्रतिबंधक कायदा (२००५) – महिलांना घरगुती हिंसेपासून संरक्षण.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय महिलांना शिक्षण, समानता, संपत्ती हक्क, विवाहस्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी क्रांतिकारी कार्य केले. त्यांनी महिलांना स्वतंत्र अस्तित्व आणि अधिकार मिळवून देण्यासाठी संविधानिक आणि सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. त्यामुळे आजही त्यांचे विचार महिलांच्या सशक्तीकरणासाठी मार्गदर्शन ठरतात.

**– प्रा. प्रिया मेश्राम, नागपूर**
लेखिका, प्रकाशक, कॉऊंसलर
७५८८२९६०९४

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### पी.एम.किसान एपीके लिंक उघडताच शेतकऱ्यांची बँक खाती होताहेत रिकामी; फसव्या पीएम किसान प्लीकेशन पासून सावध रहा

सोलापूर, (जिमाका) : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना कृषि विभागामार्फत राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अंतर्गत शेतकऱ्यांच्या मोबाईल वर पी.एम. किसान यादी किंवा पी.एम.किसान प या मॅसेजची लिंक अघडताच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात असलेली रक्कम गायब होत आहे. शेतकऱ्यांनी फसव्या पीएम किसान प्लीकेशन सावध रहा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी मोबाईलवर पी.एम. किसान लिस्ट, प किंवा पी.एम.किसान प या संदेशाची लिंक उघडू नये किंवा सदर लिंकचा वापर शेतकऱ्यांनी करू नये, तसेच अशी काही घटना घडल्यास किंवा आढळून आल्यास त्वरित जवळच्या संबंधित सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदवावी असे आवाहनही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. भोसले यांनी केले आहे.

# इंदापूर तहसील कार्यालयातील महसूल विभागाच्या लाचखाऊ बाई बरोबर लाचखाऊ साहेब देखील सापडणार का?

## इंदापूर तालुक्यातील जनतेला लागली उत्सुकता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे :

इंदापूर तालुक्यातील इंदापूर तहसील कार्यालयात महसूल सहाय्यक म्हणून कार्यरत असलेल्या कावेरी विजय खाडे या महिलेला शेतकऱ्याकडून २५ हजाराची लाच घेतल्याप्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली होती.

तिला इंदापूरच्या न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. संभाषणामध्ये साहेबांसाठी आणि तिच्यासाठी तिने पैसे मागितले होते. आता हा साहेब कोण? याचा तपास करायचा आहे!

इंदापूर तालुक्यातल्या भांडगाव येथील शेतकऱ्याच्या रस्ता प्रकरणात लाच मागणाऱ्या कावेरी खाडे हिला पुण्याच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले होते. यामध्ये तपासादरम्यान तिने स्वतः साठी आणि साहेबांसाठी पैसे मागितले होते. आता यातील ज्याच्याकडे निम्मे पैसे जाणार होते, तो साहेब कोण? हे तपासायचे असल्याने विशेष सरकारी वकील एडवोकेट प्रसन्न जोशी यांनी जिल्हा न्यायाधीश यु. एम. मुधोळकर यांच्याकडे अधिक तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी केली.

त्यावरून न्यायाधीशांनी दोन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे.

या घटनेची पूर्वपिटिका अशी आहे, भांडगाव येथील शेतकरी हनुमंत मदने यांच्या वडिलांची एक एकरच्या आसपास जमीन आहे. त्या जमिनीत जाण्यासाठी रस्ता नव्हता. त्याबाबत सन २०२० पासून तहसीलदारांकडे दावा सुरू आहे. याबाबत तहसीलदार इंदापूर यांची सुनावणी होऊन निकाल देणेबाबतची प्रक्रिया बाकी होती. त्यांनी शेतीसाठी रस्ता मिळावा, म्हणून सन २०२० मध्ये इंदापूर तहसील कार्यालयात अर्ज केला होता.

एक वर्षापासून ते इंदापूर तहसील कार्यालयात रस्ता मिळावा म्हणून अधिकाऱ्यांना भेटत होते. मात्र हेलपाट्याशिवाय पदरात काही पडत नव्हते, म्हणून त्यांनी सहाय्यक महसूल अधिकारी कावेरी खाडे हिला पुन्हा भेटून आपली कैफियत मांडल्यानंतर तिने ५० हजार रुपये द्या, तुमचे काम होईल म्हणून सांगितले.

**पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आणि पोलिसांनी करायचा आहे. हा खरोखरच मनापासून तपास होणार का ? आणि खरोखरच यातील साहेब समोर येणार का? हे या दोन दिवसात समजेल. बऱ्याचदा लाचखोरीत अडकलेल्या सापडलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या पुढील तपासातून समोर येत नाही, मात्र इंदापूरच्या प्रकरणात लाचखाऊ बाई बरोबर लाचखाऊ साहेब देखील सापडणार का? याची आता उत्सुकता आहे.**

मात्र या शेतकऱ्याने माझी शेती पडीक आहे, त्यामुळे मला एवढे पैसे द्यायला जमणार नाही असे खाडे यांना सांगितल्यानंतर शेवटी २५ हजार रुपयांवर तडजोड ठरली. मात्र चार वर्ष रस्त्यासाठी हेलपाटे मारून पदरी निराशाच मिळालेल्या व पैसेखाऊ प्रशासनाच्या तगाद्याला कंटाळून या शेतकऱ्याने नाईलाजाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधला.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली, तेव्हा खाडे या महिलेने लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने खात्री करून आज इंदापूर तहसील कार्यालयात सापळा रचला आणि लाच स्वीकारताना कावेरी खाडे हिला रंगेहाथ पकडण्यात आले होते.

# हर्षवर्धन पाटील यांची इंदापूर बस स्थानकास भेट-मुली, महिलांशी साधला संवाद



**इंदापूर बस स्थानकाला माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी सोमवारी भेट दिली व मुली महिलांशी संवाद साधला.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी स्वारगेट बस स्थानकावर घडलेल्या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर, इंदापूर बस स्थानकास सोमवारी (दि.३) भेट दिली. यावेळी त्यांनी बस स्थानकामध्ये उपस्थित मुलींशी व महिलांशी संवाद साधला. याप्रसंगी हर्षवर्धन पाटील यांनी पोलीस प्रशासनास दिवसभर महिला पोलीस ठेवण्याची सूचना केली.

या भेटी प्रसंगी हर्षवर्धन पाटील यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधताना काही अडचणी आहेत का? अशी विचारणा केली. यावर विद्यार्थिनींनी नाही असे उत्तर दिले. तसेच हर्षवर्धन पाटील यांनी एका एसटी बस मध्ये जाऊन महिला प्रवाशांशी संवाद साधला. समाजामध्ये स्त्रीला कायमच मानसन्मान व प्रतिष्ठा राहिलेली आहे, स्त्रियांच्या सुरक्षिततेची जबाबदारी आपणा सर्वांचीच आहे, असे हर्षवर्धन पाटील यांनी नमूद केले.

हर्षवर्धन पाटील म्हणाले, स्वारगेट बस स्थानकावर घडलेली घटना अतिशय दुर्दैवी असून, या घटनेतील अटक केलेल्या आरोपीवर शासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. महिला, मुलींच्या सुरक्षेसाठी एस.टी. प्रशासन, पोलीस प्रशासन यांनी सतत जागृत राहिले पाहिजे. प्रशासनाबरोबर समाजातील सर्वांची, महिला वर्गाच्या सुरक्षिततेची जबाबदारी आहे. बस स्थानकावरती पोलीस मदत केंद्र २४ तास सुरू राहणार आहे. पोलीस वर्दीचा वचक व दरारा कायम राहिला पाहिजे. तसेच महिला, मुलींनी त्रास होत असल्यास तात्काळ एसटी कर्मचाऱ्यांशी, पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन हर्षवर्धन पाटील यांनी केले.

**बस स्थानकावर महिला पोलीस ठेवण्याची सूचना**

ते पुढे म्हणाले, आपण राज्य मंत्रिमंडळ असताना ' बांधा वापरा व हस्तांतरित करा' (बीओटी) तत्त्वावर हे बस स्थानक बांधण्यात आले आहे. मध्यमवर्गीय जनतेला प्रवासासाठी एसटी हे एकमेव सुरक्षित साधन आहे. जनतेचे एसटीशी आपुलकीचे नाते निर्माण झालेले आहे. बस स्थानक व परिसराच्या स्वच्छतेकडे अधिक लक्ष द्यावे, अशी सुचना हर्षवर्धन पाटील यांनी केली.

यावेळी आगार व्यवस्थापक हनुमंत गोसावी, स्थानक प्रमुख संजय वायदंडे, इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे, इंदापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी रमेश ढगे या अधिकाऱ्यांसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी गाळेधारकांनी आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

# सिन्नूर येथील जल जीवन काम त्वरित करा अन्यथा आंदोलन करण्यात येईल : सरपंच कल्पना सोनकांबळे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी /प्रतिनिधी : अक्कलकोट पंचायत समिती येथे मौजे सिन्नूरचे सरपंच कल्पना सोनकांबळे यांनी जल जीवन मिशन योजना रखडलेले काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा विभाग उप अभियंता यानां निवेदन दिले लवकरात लवकर काम चालू करून पूर्ण करण्यात यावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल असे ते म्हणाले.

मौजे सिन्नूर ग्रामपंचायत अंतर्गत चालू असलेल्या जल जीवन मिशन पाणी पुरवठा काम १कोटी ३६ लाख रुपये काम मंजूर असून तीन वर्ष झाले आत्तापर्यंत काम अर्धवट ठेवण्यात आले आहे यावर्षी पाणी टंचाई वाढणार असून वेळेत काम न केल्याने ग्रामस्थांना पाणी साठी वणवण फिरावे लागणार आहे त्यामुळे सदर कामाचे ठेकेदार आणि पाणी टंचाई परिस्थिती झाल्यास त्यांनी गावात पाण्याची सोय करावे त्यासाठी पाण्याचे टँकर उपलब्ध करून देण्यासाठी कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

यावेळी प्रकाश कळस गोंडा, लिंगराज हौदे, ग्रामविकास अधिकारी अशोक म्हेत्रे, रुस्तम पठाण, कुलसूमबी पाटील, शकीर मुल्ला, राचम्मा पुजारी, अंबाबाई गायकवाड आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक जात विरहित असतात : विवेकानंद उंबरजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट : राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक जात, धर्म व पंथ याच्या पलीकडे गेलेले असतात. म्हणूनच ते समाजाला वंदनीय असतात. असे प्रतिपादन सरपंच विवेकानंद उंबरजे यांनी व्यक्त केले.

करजगी येथे मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या करजगी येथे विशेष श्रम संस्कार निवासी शिबिराचा समारोप करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपसरपंच शब्बीर पटेल होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, निवासी शिबिरातील स्वयंसेवकांनी प्रत्येक वार्डात जाऊन स्वच्छता केली आहे. त्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले आहे. पर्यावरण विषयक जाणीव जागृती, वृक्षारोपण संवर्धन याचे महत्त्व सांगितले आहे. त्यामुळे नागरिकातील सामाजिक जाणीवा प्रगल्भ झाल्या आहेत.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या करजगी येथील निवासी शिबिराचा समारोप**

शाबीर पटेल म्हणाले की, राष्ट्राचा विकासात स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण भागात गर्भवती माता, नवजात शिशु, आरोग्य सुविधा, पर्यावरण रक्षण, वृक्ष संवर्धन इत्यादीसाठी प्रबोधन केल्यामुळे आम्हास अधिक ज्ञात झाले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन सुषमा येळीमेळी यांनी केले, आभार प्राध्यापक राजशेखर पवार यांनी मानले. कार्यक्रमास दयानंद उंबरजे, संगीता गंगदे, दस्तगीर गोडीकट्टी उपस्थित होते.

# लोकशाही दिनात २२ शासकीय कार्यालयाकडे ३२ तक्रार अर्ज प्राप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर, (जिमाका) : प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन घेण्यात येतो. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित आजच्या लोकशाही दिनात जिल्ह्यातील २२ शासकीय कार्यालयात च्या ३२ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. या तक्रारी संबंधित कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत असून त्या कार्यालयानी तात्काळ या तक्रारींचा निपटारा करावा. तसेच तक्रार करण्यासाठी येत असलेल्या नागरिकांशी सर्व संबंधित कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी चांगली वर्तणूक ठेवावी असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार व उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी दिले.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, कौशल्य विकास कार्यालयाच्या सहाय्यक संचालक संगीता खंदारे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा कारागृह अधीक्षक सुशील कुंभार, तहसीलदार श्रीकांत पाटील, आरोग्य विभागाचे डॉक्टर विजय वरवटकर, यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

लोकशाही दिनात संबंधित शासकीय कार्यालयाकडे आलेल्या तक्रारी पुढील प्रमाणे:- जिल्हा परिषद सोलापूर- ५ , पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण - २, पोलीस आयुक्त सोलापूर शहर- १, जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख कार्यालय सोलापूर- १, कामगार आयुक्त- १, सार्वजनिक बांधकाम विभाग- १, महसूल शाखा- २, तहसिलदार बार्शी-१, तहसिलदार उत्तर सोलापूर- १, महावितरण सोलापूर-३, प्रबंधक जिल्हा अग्रणी बँग सोलापूर-१, भुसंपादन शाखा- १, उपविभागीय अधिकारी पंढरपूर-२, तहसिलदार माळशिरस- १, उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रं.२- १, भविष्य निर्वाह निधी कार्यालय, सोलापूर- २, तहसिलदार पंढरपूर-१, प्रबंधक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सोलापूर-१, जिल्हा उपनिबंधक सह संस्था सोलापूर-१, प्रादेशिक सहसंचालक (साखर) सोलापूर विभाग, सोलापूर- १, तहसिलदार महसूल- १ आणि दुय्यम निबंधक सोलापूर-१ अशा एकुण ३२ तक्रारी अर्ज जिल्हा लोकशाही दिनामध्ये प्राप्त झालेल्या आहेत.

**आरोपी पोलिसांच्या ताब्यात** | **तु गावात ये तुझा अंगठा जागेवर ठेवत नाही म्हणत महिलेला जिवे मारण्याची धमकी**

# जातिवाचक शिवीगाळ ! शिवली गावातील प्रकरणात ॲट्रासीटीचा गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/ अमर जाधव :

औसा तालुक्यातील शिवली येथे एका महिलेच्या नावाने खोटा व बनावट अर्ज करून त्यावर खोटे अंगठा लावून सदरील महिलेच्या मुलास खोट्या गुन्ह्यात अडकवणे साठी आई ने अर्ज दिले असे भासवून विविध शासकीय कार्यालयात अर्ज दिले होते.

याप्रकरणी सदरील महिलेने दिलेल्या तक्रारीवरून संबंधित खोटे अर्ज दाखल करणाऱ्यांविरुद्ध भादा पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

याचा राग मनात धरून सदरील प्रकरणातील महिलेसह याचाच राग मनात धरून फोन वर जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी भादा पोलीसात ॲट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपीस पोलिसांनी पुणे येथून अटक केली आहे.

दि. २७ जानेवारी रोजी गंगाबाई गोविंद कांबळे घरी असताना शिवली पोष्टात तुमचे टपाल आले आहे अशी माहिती मिळाल्यावरुन त्या पोष्टात जाऊन टपाल घेऊन घरी आले व सदर टपाल फोडून त्या अडाणी असल्यामुळे शेजारील मुलाकडून सदरचा टपाल वाचून घेतला असता त्या टपालातून त्यांच्या लक्षात आले की कधीही शासकीय कार्यालयात गेले नसताना व त्यांनी कुठेही कोणताही तक्रार अर्ज दिलेला नसताना त्यांचा मुलगा पांडूरंग याला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी त्यास त्रास व्हावा त्याची बदनामी व अपमान व्हावा या उद्देशाने व दोन समाजात जातीय तेंढ निर्माण होऊन व त्या खोट्या तक्रार अर्जात शिवली गावातील काही लोकांचे नावे टाकुन यांचेशी पांडूरंग याचा कोणताही संबंध नसताना त्यांच्यात वैर व दुश्मनी निर्माण करण्यासाठी व त्यांच्यात वाद होण्यासाठी तानाजी गोरोबा शिंदे यांनी गंगाबाई यांच्या नावाने बनावट व खोटे तक्रार अर्ज तयार करुन त्यावर खोटा अंगठा लावून ते तक्रार अर्ज विविध शासकिय कार्यालयात गंगाबाई यांनी स्वतः तक्रार अर्ज केले आहेत असे भासविल्याने तानाजी शिंदे विरुध्द १ फेब्रुवारी रोजी भादा पोलीस ठाणे येथे मा.न्या.सं.२०२३ कायदा कलम ३९१ (२) नुसार गुन्हा दाखल केला आहे

त्याचाच राग मनात धरुन दि.६ फेब्रुवारी रोजी गंगाबाई कांबळे या शिवली येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोरुन जात असताना गंगाबाई कांबळे यांना फोन वर तुला गावात आलेवर बघतो. तुझा अंगठाच जागेवर ठेवत नाही, म्हणून मला जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी गंगाबाई कांबळे यांच्या फिर्यादीवरून भादा पोलिसात तानाजी शिंदे यांच्या विरोधात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधात्मक कायदा कलम ३(१)(r),३(१)(s),२९६,३५१(२),३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे याप्रकरणी तानाजी शिंदे यास पोलिसांनी अटक करून न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे. घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी औसा कुमार चौधरी करित आहेत.

# ६ वर्षाच्या अफिया खलील पठाण यांनी पूर्ण केला पहिला रोजा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट शहरातील होटकर गल्ली येथे राहणाऱ्या खलील पठाण यांची लेक अफिया खलील पठाण वय ६ वर्ष या चिमुरडीने पवित्र रमजानचा पहिला रोजा पूर्ण केला. याबद्दल अफियाचा घरातील आई, वडील, काका, काकू, आजी-आजोबा, तसेच गल्लीतील मुस्लिम बांधवांनी अभिनंदन केले.

इस्लाममध्ये कलमा, नमाज, रोजा, जकात, हज हे पाच प्रमुख तत्व आहे. यात प्रत्येकाने रोजा ठेवणे बंधनकारक आहे. रमजान महिन्यात मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात रोजे (उपवास) करतात. मोठ्यासह लहान मुले, मुलीही रमजानचे उपवास करतात.

प्रामुख्याने ७ वर्षांपेक्षा लहान मुले, मुली रोजाचा उपवास करीत नाहीत. परंतु अफिया ने पहिला उपवास करण्याचा हट्ट करत तो पूर्ण केला. रोजा सोडण्यापूर्वी अफियाला नवीन कपडे हार घालण्यात आले.

सायंकाळी ०६ वाजुन ३६ मिनिटांनी अफिया खलील पठाण वय ६ वर्ष या चिमुरडीने पवित्र रमजानचा पहिला रोजा उपवास सोडला.

## थोडक्यात...




### मिटींगला का गेला या कारणावरून तरुणास मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : आमच्या मंडळाची मीटिंग सोडून तू रावण साम्राज्याच्या मिटींगला का गेला या कारणावरून तरुणास कोयत्याने पाठीवर मारून जखमी केल्याची घटना १ मार्च रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास क्रीडा संकुल गेट समोर घडली. या प्रकरणी दर्शन अच्युत भोसले (वय-२९-,रा.भारत नगर,कुमठा नाका) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून आप्पा कांबळे, शेखर सुरेखर, अभिषेक रोहिटे व एक अज्ञात इसम सर्व (रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी व फिर्यादी यांचा भाऊ रोहित असे फिर्यादी यांचा चहाचा गाडा बंद करून घरी येत असताना वरील ठिकाणी संशयित आरोपी यांनी फिर्यादीस यांना पाहून लय मस्ती आली आहे. पुण्यावरून येथे का खायला आला आहे. आमच्या मंडळाची मीटिंग सोडून तू रावण साम्राज्याच्या मिटींगला का गेला असे म्हणून आप्पा कांबळे याने त्याच्या हातातील कोयत्याने फिर्यादीच्या हातावर व पाठीवर मारून जखमी केले.तसेच आज तू वाचला, तुला उद्या खल्लास करतो अशीच दमदाटी केली आहे. व हे भांडण सोडवण्यासाठी फिर्यादीचा भाऊ मध्ये गेला असता त्याला देखील शिवीगाळ करून दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोसई.बनकर हे करीत आहेत.

# तंत्रज्ञानाचा उपयोग विधायक दृष्टीने करावा : संपादक राजीव खांडेकर

## 'पत्रकारिता काल, आज आणि उद्या' या विषयावर स्वेरीत दुसरी राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'आज जगात काय होत आहे ते लगेच सर्वांना समजते. तंत्रज्ञानाच्या युगात जग खूप जवळ आले आहे, मोबाईलमुळे जग कवेत आले आहे. अशा वेळी पत्रकारांना मात्र सक्रीय रहावे लागते. बदलत्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अफाट संधी निर्माण झाली आहे त्यामुळे चांगली कौशल्याची कामे करायची आपली तयारी हवी. जगभरात शेती आणि नर्सिंग यामध्ये मनुष्यबळाची मोठी मागणी आहे. आज उपलब्ध तंत्रज्ञानाचा उपयोग आपण विधायक दृष्टीने करावा.' असे प्रतिपादन एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांनी केले.

पंढरपूर प्रेस क्लब आणि स्वेरी पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेरीमध्ये 'पत्रकारिता काल, आज आणि उद्या' या विषयावर पत्रकारांसाठी आयोजिलेल्या दुसऱ्या राज्यस्तरीय एकदिवशीय कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी संपादक राजीव खांडेकर हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे होते. पत्रकारितेतील आद्यगुरु आचार्य बाळशास्त्री जांभेकर प्रतिमा पूजन, महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत, व स्वेरीच्या गीतानंतर स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी स्वागतपर भाषणात

**ग्लोबल वॉर्मिंग मुळे पृथ्वी सध्या धोक्यात आहे. ही वाचविण्यासाठी प्रत्येकाने एक तरी झाड लावणे आवश्यक आहे. जर आत्ताच झाडे नाही लावली नाहीत तर प्रवास करताना भविष्यात ऑक्सिजनची बाटली सोबत घ्यावी लागेल. या कार्यशाळेच्या माध्यमातून तंत्रज्ञान व पत्रकारिता याची सांगड घालण्याचा प्रयत्न स्वेरीने यशस्वीपणे केला आहे.**
**– डॉ. प्रकाश महानवर,**
**कुलगुरू, पु.अ.हो.सो.वि.सोलापूर**

स्वेरीच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे, मिळालेली मानांकने व राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यामागचा हेतू स्पष्ट केला. प्रास्ताविकात संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीत संतांचे असलेले महत्व व त्यानी समाजाच्या हितासाठी दिलेले योगदान आज आपण वारंवार संदर्भासाठी घेऊन कसे वापरता येईल आणि पंढरपूर आणखी कसे समृद्ध करता येईल याचा परामर्श घेवून पत्रकारांसाठी आयोजिलेल्या या कार्यशाळेविषयी माहिती दिली. अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. महानवर म्हणाले की, 'आज अध्यात्म आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालायला हवी. केवळ नोकरीच्या मागे न लागता नेहमीच्या शिक्षणाबरोबर कौशल्य विकसित करायला हवीत. आज पत्रकारितेचा उपयोग समाजासाठी होत असताना अनेक बदल होत आहेत. मातीमध्ये मिसळा, नैसर्गिक गोष्टीचा पुरेपूर वापर करा. खेड्यात, शेतात चांगले वातावरण मिळते. स्वच्छ ऑक्सिजन मिळतो. परंतु आज उपलब्ध असलेली ही संपत्ती आज धोक्यात आहे, ती वाचविण्याची गरज आहे.' दुसऱ्या सत्रात 'पत्रकारीते समोरील आव्हाने आणि समाजातील सर्व घटकांचा पत्रकारिता या लोकशाहीतील चौथ्या स्तंभाबाबतीत हवा असलेला सहभाग' या विषयावर साधना मासिकाचे संपादक विनोद शिरसट म्हणाले की, 'दर्पण आणि दिग्दर्शन ह्या दोन गोष्टी पत्रकारीतेमधून डोकावत असतात. 'दर्पण' चांगले दाखविले तर 'दिग्दर्शना'चे काम कमी होते. टिळक आणि आगरकर यांच्या काळातील पत्रकारिता आणि आजची पत्रकारिता यात जमीन आसमानचा बदल झाला असून आज ध्येयवाद कमी झाला असून त्यात पेशा वाद सुरु झाला आहे. इलेक्ट्रॉनिक्स मिडिया आल्यामुळे प्रिंट मिडीयाचा फायदाच झाला आहे. म्हणून समाज, लोकशाही बळकट करण्यासाठी पत्रकारांची भूमिका महत्वाची आहे.' असे सांगून पत्रकारितेपुढील आव्हाने सांगितली. यावेळी चर्चासत्राच्या अध्यक्षीय मनोगतात एबीपी माझाचे खांडेकर म्हणाले की 'आपली पत्रकारिता ही आग ओकणारी आहे की विझवणारी याची जाणीव असावी. पत्रकारिता हे ध्येय, पेशा, व्यवसाय व धंदा असा बदल होत आहे.' तिसऱ्या सत्रात 'पंढरपूर व वारकरी संत साहित्य संदर्भातील पत्रकारांचे योगदान' या विषयावर 'रिंगण'चे संपादक सचिन परब म्हणाले की, पंढरीचे वैभव सर्वदूर पोचवायचे असेल तर संतांच्या विचारांशिवाय पर्याय नाही. संतांच्या विचारांची नव्या पद्धतीने पुन्हा मांडणी करावी लागणार आहे. साने गुरुजी, संत सोयराबाई धर्माची चिकित्सा, बसववचने,नाथ महाराजांच्या गाथा, अभंग यावर परब यांनी प्रकाश टाकून ए.आय. हे तंत्रज्ञान भविष्यात फायद्याचे की तोट्याचे यावर अभ्यासपूर्ण भाष्य केले. चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानावरून 'महाराष्ट्र दिनमान'चे संपादक विजय चोरमारे म्हणाले की, 'गेल्या काही वर्षांमध्ये वारकरी संप्रदायात कट्टरता जपणाऱ्यांचा शिरकाव झाला आहे. यामुळे प्रवाह प्रदूषित होत असून चळवळ प्रदूषित करण्याचा हा प्रयत्न आहे. जादूटोणा विधेयक विधानसभेत मांडत असताना अंधश्रध्दा निर्मुलनाचे काम डॉ. नरेंद्र दाभोळकर करीत होते. त्यांची हत्या झाली, त्याची जबाबदारी खरी तर वारकरी संप्रदाय व पत्रकारितेची आहे. आपल्याकडे एखादा मंत्री आला तर आपल्या भागातील विकासाचे प्रश्न विचारावे.' सरकारला वेळोवेळी जागृत राहण्यासाठी पत्रकारांनी प्रश्नांचा पाठपुरावा केला पाहिजे. यावेळी पत्रकारांचे प्रतिनिधी म्हणून जेष्ठ पत्रकार सिद्धार्थ ढवळे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील मास कम्युनिकेशन विभागातील विद्यार्थी, सोलापूर जिल्ह्यासह लगतच्या जिल्ह्यांतील प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडियातील जवळपास ३५० पत्रकार, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त एच. एम. बागल, विश्वस्त बी.डी.रोंगे, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. यशपाल खेडकर यांनी केले तर स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी आभार मानले.

### क्षणचित्रे–

- **पाहुण्यांची व पत्रकारांची भोजन व्यवस्था, बैठक व्यवस्था, स्वागत व आदर सन्मान त्यातील वेगळेपणा हे सर्व सुंदर व नेटके झाल्यामुळे पाहुणे विजय चोरमारे यांनी स्वेरीचे कौतुक केले.**
- **पंढरीच्या परंपरेला अनुसरून आलेल्या पाहुण्यांना पांडुरंग मूर्ती, टोपी, उपरणे आणि गाथा देवून यथोचित सन्मान करण्यात आला.**
- **साधेपणा आणि रुचकर शाकाहारी भोजन पाहून पाहुणे व पत्रकार प्रसन्न झाले.**
- **पत्रकारांना नावनोंदणी पासून ते प्रमाणपत्र मिळेपर्यंत कोणतीही अडचण आली नाही.**

## अशोक सोनकांबळे यांचा आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे विकासाभिमुख लोकप्रिय आमदार तथा नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून काल दि.२ मार्च रविवार रोजी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नांदेड येथील साई सुभाष निवासस्थानी राष्ट्रवादी अजित दादा पवार गटात जाहीर प्रवेश केला, यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी अशोक सोनकांबळे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात शाल श्रीफळ पुष्पहार घालून स्वागत करून पक्ष प्रवेश केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अशोक सोनकांबळे यांनी माजी आमदार शामसुंदर शिंदे यांचे प्रसिद्धी प्रमुख म्हणून पाच वर्ष काम केलेले असून अशोक सोनकांबळे पत्रकार आहेत,दरम्यानच्या काळात त्यांनी केलेल्या कार्याबद्दल, ते मतदारसंघात सर्व परिचित असून, त्यांची प्रामाणिक, शांत, सयंमी,मितभाषी व्यक्तीमत्व म्हणून मिडिया परिवारात ओळख आहे.त्यांनी लोहा तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे तालुका सदस्य व सिद्धार्थ नगर मित्र मंडळाचे अध्यक्ष म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. त्यांनी अनेक सामाजिक, शैक्षणिक, राजकीय उपक्रमांत समजापयोगी भावनेने योगदान दिले आहे. सिद्धार्थ नगर येथे,सर्व जाती धर्माच्या सण उत्सवात हिरहिरीने सहभागी होऊन,महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी,दुर्गा देवी,गणपती उत्सव, मोहरम,रमजान आदी उत्सवात सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यात यशस्वीपणे भुमिका पार पाडली आहे. अशोक सोनकांबळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटात प्रवेश केल्याने आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी जिल्हा परिषद सदस्य युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांनी अशोक सोनकांबळे यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी आंबेडकरी चळवळीचे युवा नेते रविदादा गायकवाड, लोहा नगर परिषदेचे मा. नगरसेवक भास्कर पाटील पवार,शिक्षण जिल्हा पतपेढीचे चेअरमन अशोक पाटील मारतळेकर, उपाध्यक्ष सुहास मुळे,सचिन पवार,सह मित्रपरिवार उपस्थित होता. त्यांच्या निवडीबद्दल आप्तवासिय ,मित्रपरिवार, हितचिंतकांनी सोशलमिडियांच्या माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव सुरू केला असून,भावी कार्यासाठी शुभेच्छा देतांना दिसून येत आहेत .

## व्यसनमुक्त समाजाची निर्मिती व्हावी हाच प्रबोधनाचा हेतू : विठ्ठल माने

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : युवकांनी व्यसनमुक्त व्हावे तर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी बालविवाह पासून दूर राहावे यासाठी कीर्तनातून प्रबोधन करत आहे असे भावनात्मक उद्गार कीर्तनकार विठ्ठल माने यांनी व्यक्त केले.

### करजगी येथी निवासी श्रमसंस्कार शिबिरात कीर्तनातून प्रबोधन कार्यक्रम

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय अक्कलकोट येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित करजगी येथील विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिरात स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, अंधश्रद्धा तसेच दांभिकता यापासून समाजाने दूर राहावे, यासाठी कीर्तनातून आम्ही प्रबोधन करतो. युवक-युवती आमच्या कार्यक्रमास प्रतिसाद देतात म्हणूनच समाज परिवर्तन घडत आहे. हीच आमची फलश्रुती आहे.

यावेळी मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, राज्यातील संतांनी विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारून अंधश्रद्धा रूढी परंपरा यावर प्रहार केला. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत बसवेश्वर यांनी समाजातील दांभिकता नष्ट करण्यासाठी अभंग, वचने, भारुड यांची रचना केली आहे. तसेच संत बसवेश्वरांनी कृतीयुक्त कार्यक्रमातून समाज प्रबोधन केले आहे. संतांचा आदर्श समाजाने घेतला पाहिजे.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्राध्यापिका शितल झिंगाडे- भस्मे यांनी केले, आभार कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक राजशेखर पवार यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन स्वयंसेवक समर्थ पवार पायल कांबळे यांनी केले.

### कीर्तनातून झाले ग्रामस्थांचे प्रबोधन

**व्यसनमुक्ती, पर्यावरण वृक्षारोपण, बचत गट, आरोग्य, बालविवाह प्रतिबंध आदी विषयावर विठ्ठल माने यांनी प्रबोधन केले. त्यास करजगी ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद दिला.**

### नाशिक मधील ऐतिहासिक बौद्ध धम्म परिषदेत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा निर्धार

# महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात घेण्याचा आमचा निर्धार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक/ मुंबई ( कमलाकर सोनकांबळे ). दि.३ महाकरुणिक तथागत भगवान गौतम बुद्धांना जिथे ज्ञान प्राप्ती झाली ते बिहार मधील बुद्धगया जगातील सर्व बौद्धांचे सर्वोच्च श्रद्धास्थान आहे.बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांचे आहे.महाबोधी टेम्पल कायदा रद्द करून महाबोधी महाविहार च्या व्यवस्थापन समिती मध्ये सर्व विश्वस्त बौद्ध धम्माचे नियुक्त करावेत.महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या हा आज ऐतिहासिक धम्म परिषदेत मंजूर ठराव बिहार च्या मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून कळवणार आहे. तसेच लवकरच बिहार चे मुख्यमंत्री नितीश कुमार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात घेण्याचा आपला निर्धार असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी व्यक्त




केला.

श्री काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या ९५ व्या वर्धापन दिनानिमित्त देश-विदेशातील भिक्खु संघाच्या अनुयायांच्या उपस्थितीत रविवारी दि. २ मार्च रोजी नाशिकमधील हुतात्मा अनंत कान्हेरे गोल्फ क्लब मैदानावर बौध्द धम्म परिषद ना.रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेत पार पडली. याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी रिपब्लिकन पक्षाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष आणि धम्म परिषदेचे स्वागत अध्यक्ष प्रकाश लोंढे; राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; राज्य कार्याध्यक्ष बाबूराव कदम; रमेश मकासरे;अशोक गायकवाड; श्रीकांत भालेराव; सिद्धार्थ कासारे; सूर्यकांत वाघमारे आयआरएस समीर वानखेडे, अभिनेत्री क्रांती रेडकर-वानखेडे, भूषण लोंढे दीक्षाताई लोंढे ; मनालीताई जाधव; यांच्या सह ८ देशांतील बौध्द भिक्खुसंघाचे अनुयायी तसेच हजारो बौध्द अनुयायी उपस्थित होते.भदंत सुगत महाथेरो ; भदंत राहुल बोधी महथेरो; भदंत संघरत्न यांनी अनेक ठरावांचे वाचन केले.

**अडीच हजार वर्षांपुर्वी भगवान गौतम बुद्धांनी भारतात लोकशाहीचा पाया रचला. जगाला शांतीचा विचार दिला. हाच विचार जगातील सर्वच मोठ्या देशांमध्ये रुजला आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच लोकशाहीचे प्रतिक असून त्यांनी संविधानाची निर्मिती केली आहे. संविधानाला हात लावण्याची कोणाची हिंमत नाही, पण कोणी हात लावल्यास त्याला सोडणार नाही, असा इशारा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी दिला.**

बुध्दगया येथे भगवान बुध्दांना ज्ञानप्राप्ती झाली. ज्ञानच जगात श्रेष्ठ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञानाचीच प्राप्ती केली म्हणून त्यांना संविधान लिहिण्याचा अधिकार मिळाला. २ मार्च १९३० रोजी बाबासाहेबांनी काळाराम सत्याग्रह केला, मंदिर प्रवेशासाठी ते लढत नव्हते तर संपूर्ण मानव जातीच्या हक्कासाठी ते लढत होते. त्याकाळी दलिताना काळाराम मंदिरात प्रवेश मिळाला नाही मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीमुळे आज मला काळाराम मंदिरात मानाने प्रवेश करण्याची संधी मिळाली . पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल ना.रामदास आठवले यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे यावेळी आभार मानले. बँकॉक पट्टाया च्या धर्तीवर नाशिक मध्ये सुद्धा एखाद्या डोंगरावर भगवान बुद्धांची मूर्ती कोरून बौद्ध पर्यटन स्थळ उभारण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे अशी सूचना ना.रामदास आठवले यांनी यावेळी केली.

स्वागताध्यक्ष प्रकाश लोंढे, समीर वानखेडे, क्रांती रेडकर यांनीही मनोगत व्यक्त केले. बौध्द भिक्खु संघाने यावेळी बुध्दगया येथील भगवान बुध्दांचे परमपवित्र स्थान बौध्द भिक्खु संघाच्या ताब्यात देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.